लोकमत पु. पान क्र. 1

पोलिस आयुक्तांनी केले सन्मानित

# ११ अधिकारी, कर्मचाऱ्यांना पोलिस महासंचालक पदक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या मीरा रोड येथील आयुक्तालयात पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांच्या हस्ते १ मे रोजीच्या महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण पार पडले. यावेळी पोलिस महासंचालक पदक जाहीर झालेल्या आयुक्तालयातील ११ पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना आयुक्तांनी पदक देऊन सन्मानित करत पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले.

बुधवार १ मे रोजी पोलिस आयुक्तालयात ध्वजारोहण केल्यावर आयुक्त पांडेय यांनी आपले मनोगत मांडले. पोलिस आयुक्तालयातील सर्व नागरिक, पोलिस कर्मचारी व अधिकारी यांना आयुक्तांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनच्या शुभेच्छा दिल्या.



पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांच्या हस्ते अविराज कुराडे, तेजश्री शिंदे, अजय मांडोळे, रामचंद्र पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अपर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक, पोलिस उपायुक्त मुख्यालय सुहास बावचे, गुन्हे शाखा उपायुक्त अविनाश अंबुरे, मीरा-भाईंदर परिमंडळ-१ चे उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्यासह सहायक पोलिस आयुक्त, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पोलिस दलातील गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलिस महासंचालक पदक जाहीर झालेले मीरा-भाईंदर गुन्हे शाखा युनिट-१ चे पोलिस निरीक्षक अविराज कुराडे, सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, मीरा-भाईंदर भरोसा सेलच्या प्रभारी सहायक पोलिस निरीक्षक तेजश्री शिंदे, पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय जाधव, सहायक पोलिस उपनिरीक्षक अजय मांडोळे, रामचंद्र पाटील व अशोक ईशी, पोलिस हवालदार जयप्रकाश जाधव, आनंद मोरे आणि मुकेश पवार, पोलिस शिपाई नामदेव ईश्वलकर यांना पदक प्रदान करण्यात आले. पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## शरीरसंबंधासाठी तरुणीवर हल्ला; तरुणावर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** शरीरसंबंध करण्यासाठी एका तरुणीवर हल्ला करण्याचा प्रकार मीरा रोड परिसरात घडला आहे. ही घटना शांती शॉपिंग सेंटर येथे घडली.

मूळच्या गुजरातच्या असलेल्या आणि मीरा रोड भागात राहणाऱ्या एका अठरा वर्षे वयाच्या तरुणीला वेदप्रकाश काशिनाथ मोरया (वय ३८, रा. नाकोडा हाइट्स, यशवंत गौरव, नालासोपारा) याने तिच्याशी शारीरिक संबंध करण्याच्या उद्देशाने व तिचे कपडे काढण्याच्या उद्देशाने तिच्यावर हल्ला केला. नयानगर पोलिसांनी ३० एप्रिल रोजी मौर्या याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक धनंजय गायकवाड तपास करत आहेत.

## मुलीवर अत्याचार



**मीरा रोड :** मीरा रोड भागातील महापालिकेच्या एका सार्वजनिक शौचालयात नऊ वर्षीय मुलीवर जवळच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या चौदा वर्षीय मुलाने बलात्कार केला. सार्वजनिक शौचालयात मुलीला मागून पकडून मुलाने तिच्यावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी तेथील एका वडापाव विक्रेत्या महिलेच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी २९ एप्रिल रोजी मुलावर बलात्कार, पॉक्सोनुसार गुन्हा दाखल केला आहे. नवघर पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## महिलेला शिवीगाळ

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या शिर्डीनगर भागात एका महिलेशी लगट करण्याच्या उद्देशाने तिचा पाठलाग करून फोनवर का बोलत नाही? असे म्हणत तिला शिवीगाळ आणि दमदाटी करणाऱ्या आरोपीवर नवघर पोलिस ठाण्यात २९ एप्रिलच्या रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शिर्डीनगर भागात सोमवारी सायंकाळी ४ च्या सुमारास घडली. याप्रकरणी वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस तपास करत आहेत.

CS CamScanner

लोकमत पृ. पान ३

# मेअखेर रस्त्यांची कामे पूर्ण करा, अन्यथा मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

## प्रताप सरनाईक यांचा मीरा-भाईंदर पालिकेला इशारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेचे योग्य नियोजन आणि समन्वय नसल्याने शहरात सुरू असणाऱ्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांची कामे संथगतीने सुरू असून, त्यातून वाहतूककोंडी व रहदारीला त्रास होत आहे. त्यामुळे स्वतः आयुक्तांनी लक्ष घालून मे महिन्याच्या अखेरपर्यंत काँक्रीट रस्त्यांची कामे पूर्ण करावीत, असे आमदार प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे.

मीरा-भाईंदर शहराला खड्डेमुक्त करण्यासाठी आपण सतत प्रयत्न करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंजुरीने शहरात एमएमआरडीए आणि पालिकेच्या माध्यमातून काँक्रीट रस्ते बांधण्याचे काम सुरू झाले आहे. काँक्रीट रस्त्याच्या कामांसाठी शासनाकडून निधी मंजूर करतानाच पालिकेला कर्ज घेता यावे, म्हणून त्यालासुद्धा मंजुरी आणून दिली आहे.

पालिकेने व एमएमआरडीएने अनेक सिमेंट रस्त्यांची कामे चालवली आहेत, सिमेंट रस्ते बनविण्यासाठी आधीचे रस्ते खोदकाम करताना आतील जलवाहिन्या, नळ जोडण्या, वीज केबल, गॅस पाइपलाइन आदीचे काम करणे आवश्यक आहे.



मीरा-भाईंदर महापालिका हद्दीतील मीरा रोडमध्ये असे रस्ते खोदून ठेवल्याने आणि काम रखडल्याने दुर्घटना घडत आहेत.

### महापालिकेचे ठोस नियोजन नाही

अनेक भागांत तर रस्ते खोदून ठेवले आहेत व काम रखडले आहे. त्यामुळे नागरिकांना वाहतूककोंडीसह रहदारीला अडथळे सहन करावे लागत आहेत. धुळीचे साम्राज्य पसरल्याने लोकांना आरोग्याची समस्या भेडसावत आहे. एमएमआरडीएच्या रस्त्यांची कामे पालिकेच्या कामांच्या तुलनेत वेगाने होत आहेत. पावसाळ्याच्या आधी कामे पूर्ण करण्याबाबत महापालिकेचे कोणतेही ठोस नियोजन दिसत नाही, त्यामुळे रस्त्यांची सध्या सुरू असलेली कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होतील की नाही, याबाबत शंका आहे.

'सखोल स्वच्छता मोहीम' राबवून वेळोवेळी रस्त्यावरील धुळीचे साम्राज्य दूर व्हावे, रस्ते स्वच्छ राहावेत, म्हणून रस्ते पाण्याने धुण्यात यावेत हे मुख्यमंत्र्यांचे आदेशही महापालिकेने पाळलेले नाहीत. मुख्यमंत्र्यांनी स्वतः रस्त्यांची कामे वेळेत पूर्ण करा, असे सूचित करूनदेखील मुख्यमंत्र्यांच्या आदेशांकडेही दुर्लक्ष केले जात आहे. संथगतीने सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांमुळे जनतेतील रोष वाढत असून, त्याचा आम्हाला लोकसभा, विधानसभा निवडणुकीत फटका बसू शकतो, असे आमदार प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे.

CS CamScanner

लोकमत पु. पान क्र. ३

# शेकडो नागरिकांची विरारमध्ये फसवणूक

## अनधिकृत इमारतींबाबत गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारमध्ये मनपाच्या परवानगीअभावी चार-चार मजली अनधिकृत इमारती बांधून त्यातील २५८ सदनिका व ३८ गाळे ग्राहकांना बोगस कागदपत्रांच्या आधारे विकण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. दरम्यान, संबंधित अनधिकृत बांधकामांसंदर्भात विकासकांविरोधात विरार पोलिसांनी एमआरटीपीअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

विरारच्या फुलपाडा परिसरात गेल्या काही कालावधीत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाली आहेत. यात काही भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात चार-चार मजली अनधिकृत इमारती बांधून या इमारतींतील २५८ सदनिका व ३८ गाळे ग्राहकांना बोगस दस्तावेजाचा आधार घेत विकण्यात आले आहेत. आधीच बोगस सीसी घोटाळ्यावरून मनपाची नाचक्की झालेली असतानाही पुन्हा अनधिकृत इमारती उभ्या राहत आहेत.




### नागरिकांमध्ये तीव्र संताप

विरार शहरात मागील वर्षात १५० अनधिकृत इमारतींचे निर्माण झाले आहे. या इमारतींतील सदनिका आणि गाळे ग्राहकांना बोगस कागदपत्रांचा वापर करून विकल्या जात असल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. लोकसभा निवडणुकीत अधिकारी व्यस्त असल्याने त्याचा फायदा उचलत भूमाफियांनी अनधिकृत बांधकामांचे मजले चढवण्यास घेतले असल्याचा आरोप होत आहे.



# कारमधून ऑइल पडल्याचे सांगत दोन लाख चोरले

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : कारमधून ऑइल पडल्याचे सांगत दोन लाख चोरण्याची घटना मीरा रोड भागात घडली आहे. ३० एप्रिल रोजी काशिगाव पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. काशिगाव पोलिस ठाण्याचे सहायक फौजदार ओम प्रकाश पाटील तपास करत आहेत.

मीरा रोडच्या कनकिया भागातील गौरव पॅराडाईजमध्ये राहणारे राहुल दुबे याचा मोटार ट्रेनिंग स्कूलचा व्यवसाय आहे. राहुल हा त्याचा भाऊ अनुपम दुबेसह घरून दहिसर येथे जात असताना मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील सगणाई माता मंदिर चौक येथे अनोळखी इसमाने येऊन तुमच्या कारचे ऑइल पडत आहे, असे सांगितले. यामुळे ते पाहण्यासाठी दोघे खाली उतरले व बोनेट उघडून ऑइल कुठून पडतेय पाहू लागले. ती संधी साधून अनोळखी चोरट्याने गाडीच्या मागील सीटवर ठेवलेली दोन लाख रुपयांची रोकड चोरली.

CamScanner

लोकमत पू. पान क्र. २

## सोन्याचे दागिने बनविणारा पसार

**नालासोपारा :** संतोष भवनच्या शर्मा वाडीतील विनोद रॉय चाळीत राहणारे ज्वेलरी व्यावसायिक रमाशंकर सोनी (४२) आणि साक्षीदार मुन्ना मंडल या दोघांनी सन् २०२२ ते ३० एप्रिल २०२४ दरम्यान साबीर अली यांना सोन्याचे दागिने बनविण्यासाठी दिले होते. आरोपी साबीरचा सोन्याचे दागिने बनविण्याचा कारखाना होता. रमाशंकर यांनी १३८ ग्रॅम आणि मुन्ना यांनी ५६ ग्रॅम सोने असे एकूण १३ लाख ५८ हजार रुपये किमतीचे १९४ ग्रॅम सोने दिले होते. आरोपीने सोने न परत करता कारखाना बंद करून विश्वासघात करून पसार झाला आहे. तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## शॉक लागून तरुणाचा मृत्यू

**नालासोपारा :** विरारमध्ये राहणाऱ्या कौस्तुभ वैती (३४) यांचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मंगळवारी ते घराच्या बाजूला मोटार चालू करून पाणी भरण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना मोटारचा शॉक लागला. त्यांना घरच्यांनी उपचारासाठी जवळच्या हॉस्पिटलमध्ये नेल्यावर त्यांचा मृत्यू झाला. अर्नाळा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## तरुणीवर अत्याचार करून ब्लॅकमेल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** २३ वर्षीय तरुणी आरोपीसोबत २०२० पासून लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होती. आरोपीने तिच्यासोबत राहत असताना वेळोवेळी शरीरसंबंध करून त्याचे फोटो आणि व्हिडीओ केले होते. आरोपीने ते व्हिडीओ व फोटोज दोन आरोपींसह पीडित तरुणीच्या आईला व बहिणीला पाठवून बदनामी केली आहे. तसेच इतर दोन आरोपींनी पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले. तसेच तिला नग्न अवस्थेत व्हिडीओ कॉल करण्यास सांगून त्याचे स्क्रीनशॉट काढून दोन्ही आरोपींनी एकमेकांना पाठवून ब्लॅकमेल करत बदनामी केली आहे. आचोळे पोलिसांनी मंगळवारी तिन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पान ५

## आचोळ्यात खंडणीचा गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** एव्हर शाइन सिटीतील स्मशानभूमी रोडवर लक्षीत जाट (वय २०) हा तरुण आइस्क्रीम विक्रीची गाडी लावतो. सोमवारी रात्री लक्षीत हा आइस्क्रीमची गाडी घेऊन जात असताना, आरोपी कांती सिंघल (वय ४४) हा पोलिस अंमलदार नसतानाही पोलिसांचा गणवेश परिधान करून त्याच्या गाडीजवळ आला. तू रस्त्याच्या मधोमध आइस्क्रीमची गाडी का लावली?, तुझ्यावर केस करतो?, चल पोलिस चौकीला, असे बोलून नंतर त्याला मी मोठा अधिकारी असून, महिन्याला १५ हजार रुपये दे, तुझ्यावर केस करणार नाही, असे बोलत खंडणी मागितली. आचोळे पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पान ५

## २० लाखांच्या खंडणीसाठी अपहरण; एकाला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** पूर्वीच्या पैशाच्या वादातून एका ३२ वर्षीय व्यक्तीचे अपहरण करून २० लाख रुपये खंडणी मागणाऱ्या आरोपीला भाईंदरच्या नवघर पोलिसांनी खोपोलीमधून अटक केली आहे.

भाईंदर पूर्वेला इंद्रलोक येथे ओमशांती चौक येथे केअरिंग व फॉरवर्डिंग लॉजिस्टिकचे कार्यालय आहे. त्या कार्यालयात काम करणाऱ्या अक्षय शिंदे (वय ३२) याचे दिवसाढवळ्या अपहरण करून २० लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली होती., पैसे न दिल्यास अक्षय शिंदेचे बरे-वाईट करू, अशी धमकी अपहरणकर्त्याने दिली होती. कर्मचारी सागर आंग्रे यांच्या तक्रारीवरून नवघर पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदीप व्हसकोटी व पथकाने तांत्रिक व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोध घेऊन तो खोपोली जिल्हा रायगड येथे गेला असल्याची माहिती मिळाली. खोपोली पोलिस व नवघर पोलिसांनी संयुक्तपणे सापळा रचून इमरान शहाबुद्दीन शेख (वय २९, रा. नवरे आर्केड, नवरेनगर, अंबरनाथ पूर्व) याला अटक केली आहे. आरोपीला अटक करून ठाणे न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची कोठडी सुनावली आहे.

लोकसत्ता पू. पान १

## अपघातात प्रवाशाचा मृत्यू

**वसई :** भरधाव वेगाने जाणाऱ्या एका वाहनाने रिक्षाला धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षाचालक गंभीर जखमी झाला असून रिक्षातील प्रवाशाचा मृत्यू झाला आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर मंगळवारी ही घटना घडली. नायगावच्या वापाणे येथील दीपक सोनी (३४) हे दुपारी काशिमिरा येथून आपल्या घरी येत होते. गुजराथ वाहिनीवरील फाऊंटन हॉटेलसमोर त्यांना एका वाहनाने धडक दिली. यात रिक्षाचालक रमेश पाल हा गंभीर जखमी झाला तर सोनी यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी नायगाव पोलिसांनी वाहनचालकाविरोधात निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

लोकसत्ता पृ. पान क्र. १

# नालासोपाऱ्यातील आग दुर्घटनेत हलगर्जी

## घटनेच्या १३ दिवसांपूर्वी पोलिसांनी केलेल्या सूचनेकडे महापालिकेचे दुर्लक्ष

सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता

**वसई :** ठेकेदार निष्काळजीपणे काम करत असून त्यामुळे दुर्घटना होऊ शकते अशी लेखी सूचना आचोळे पोलिसांनी १३ दिवसांपूर्वीच महापालिकेला केली होती. मात्र त्याकडे पालिकेने दुर्लक्ष केल्याने द्वारका आगीची दुर्घटना घडल्याचे सांगण्यात येते. आगीतील ८ जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना उपचारासाठी मुंबईतील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

मंगळवारी दुपारी नालासोपारा पश्चिमेच्या आचोळे येथे गॅस वाहिनी फुटल्याने लागेलल्या आगीत द्वारका हॉटेल जळून खाक झाले. या आगीत हॉटेल मध्ये आलेले ८ ग्राहक आणि कर्मचारी जखमी झाले असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. हॉटेलसमोर गटाराचे काम सुरू असताना गॅसपाईप वाहिनी फुटल्याने ही आग लागली होती. याबाबत पोलिसांनी महापालिकेला पत्र देऊन दुर्घटनेची शक्यता वर्तवल्याचे आता उघड झाले आहे. गटाराचे काम अत्यंत निकृष्ट पद्धतीने केले जात होते. या कामामुळे अनेक दुकानांचेही नुकसान झाले होते. ज्या ठिकाणी खोदकाम सुरू आहे, त्या ठिकाणी अतिशय जुन्या इमारती आहेत. त्यामुळे पोलिसांनी दुर्घटनेची शक्यता वर्तवली होती. ठेकेदाराच्या या निष्काळजीपणाबाबत आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ बाळासाहेब पवार यांनी १७ एप्रिल रोजी महापालिका आयुक्तांना पत्र देऊन चौकशीची मागणी केली होती. मात्र आयुक्तांनी पोलिसांच्या पत्राकडे दुर्लक्ष केले. पोलिसांनी वर्तवलेली शक्यता खरी ठरली आणि मंगळवारी आग लागली. गटाराचे काम सुरू असताना पोकलेनमुळे गुजरात गॅस कंपनीची पाइपलाइन फुटली. यामुळे स्फोट होऊन भीषण आग लागली. आगीने संपूर्ण हॉटेलला वेढले. हॉटेलमध्ये ठेवण्यात आलेल्या गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने संपूर्ण हॉटेल जळून खाक झाले होते, असे पालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी दिलीप पालव यांनी सांगितले.

### चिमुकली आणि गर्भवती महिला सुखरूप

गाला नगर येथील रहिवासी अंजू यादव (२८) ही गर्भवती असून तिचा सोनोग्राफीचा अहवाल घेण्यासाठी मंगळवारी दुपारी २ वाजता ती हॉटेलसमोरील डॉक्टरांकडे गेली होती. तिच्यासोबत पाच वर्षांची मुलगी आकृती यादव आणि शेजारी राहणाऱ्या दोन महिला होत्या. डॉक्टरांनी अंजूला थोड्या वेळाने यायला सांगितले होते. त्यामुळे अंजू आपली मुलगी आणि महिलांसोबत नाश्ता करण्यासाठी या हॉटेलमध्ये गेली होती. ते खुर्चीवर बसताच अचानक समोरील काच फुटून आग लागली. कसेबसे अंजूने आपल्या मुलीसह बाहेर पडून तिचा जीव वाचवला. मात्र त्यांची मुलगी काही ठिकाणी भाजली.

### ३०० कुटुंबांचा गॅसपुरवठा बंद

गॅस वाहिनी फुटल्यानंतर गुजरात गॅस कंपनीने परिसरातील गॅसपुरवठा बंद केला आहे. त्यामुळे येथील सुमारे ३०० कुटुंबांचे स्वयंपाकघर बंद आहे. लोकं बाहेरून जेवण मागवत आहेत. हॉटेल मालकाने बेकायदा सोसायटीच्या आत जनरेटर लावल्याचे स्थानिकांनी सांगितले. याबाबत सलोमी सोसायटीचे सचिव अमित दुबे यांनी हॉटेलमध्ये बेकायदा शेड बांधली होती. आम्ही मालकाला ती हटवण्यास सांगितली होती, मात्र ती हटवली नाही. मालकाने अग्निसुरक्षा तपासणी देखील केली नव्हती असे सांगितले.

### आग दुर्घटनेची चित्रफित समाजमाध्यमांवर

या आगीची एक चित्रफित सध्या चर्चेत आहे. ठेकेदार चुकीच्या पद्धतीने खोदकाम करत असून दुर्घटना घडू शकते असे एक जण चित्रीकरण करून सांगत असतानाच स्फोट झाला आणि आग लागली. नेमकी ती व्यक्ती दुर्घटना घडेल असे सांगते आणि आग लागली. हा योगायोग होता की काय याबाबत चर्चा सुरू आहे. ही चित्रफित कुणी बनवली ते मात्र समजू शकलेले नाही.

### दोन जखमींची प्रकृती चिंताजनक

या आगीत ८ जण होरपळे असून त्यातील दोन जण ७० टक्के भाजल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. राम प्रसाद चौधरी, माखन लाल, इरसद शेख, चंद्र मोगावे, सुंदर शेट्टी, गोपाल बंगेरा, सुनील यादव, शिवा पासवान, राजकुमार आणि आकृती यादव अशी जखमींची नावे आहेत. सुंदर शेट्टी आणि गोपाल बंगेरा हे ७० टक्के भाजले आहेत. जखमींपैकी दोन जणांवर कस्तुरबा, चार जणांवर आयसीस या खासगी रुग्णालयात आणि तीन जणांवर पालिकेच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर दोन जणांना प्राथमिक उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे. बुधवारी पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. आम्ही जखमी आणि प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवत आहेत. यामध्ये कोणाची चूक आढळल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल, असे आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी सांगितले. बुधवारी पोलिसांनी १२ जणांचे जबाब नोंदवले. द्वारका हॉटेलच्या बाहेर गटार बांधण्याचे काम सुरू होते.



# विरारमध्ये दुकानाला भीषण आग

**वसई :** नालासोपाऱ्यात मंगळवारी गॅस वाहिनी फुटून द्वारका हॉटेलला आग लागल्याची घटना ताजी असतानाच बुधवारी विरार पश्चिमेच्या भागात मिसळ दुकानाला भीषण आग लागली. सकाळी पावणे आठच्या सुमारास ही घटना घडली. आगीत दुकान जळून खाक झाले आहे.

विरार पश्चिमेच्या रेल्वे स्थानकाजवळील गावठण रस्त्यावर आनंद लक्ष्मी इमारत आहे. त्यात घुमटकर मिसळचे दुकान आहे. दुकानात अचानकपणे आग लागली होती. या घटनेची माहीती पालिकेच्या विरार अग्निशमन केंद्राला मिळताच घटनास्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरू करण्यात आले होते मात्र आगीने अधिकच पेट घेतल्याने इमारतीमध्ये धुराचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे तातडीने या इमारतीमध्ये राहत असलेल्या नागरिकांना अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढले. तर दुकानात असलेले सात सिलिंडरसुद्धा बाहेर काढण्यात आले.

जवळपास दोन ते अडीच तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आल्याची माहिती पालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी दिली आहे. सुदैवाने या आगीत कोणतीही जिवीतहानी झाली नसून दुकान जळून खाक झाले आहे. आग लागली तेव्हा दुकान बंद होते आग नेमकी कोणत्या कारणामुळे याचे कारण समजले नाही.

CamScanner